# महाराष्ट्र शासन

Email- bapusaheb.sonawnae@nic.in
दूरध्वनी क्र. ०२२ २२०४७१४४

क्र. एकलव्य २०१७/प्र.क्र.३१६/का.१३
आदिवासी विकास विभाग,
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ०३२
दिनांक : २४ ऑगस्ट, २०१७.

प्रति,

सदस्य सचिव,
महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी,
तथा आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

विषय :- एकलव्य निवासी शाळा सुरू करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :-१) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शाआशा १०००/ प्र.क्र.४८/का.१३, दि.११/९/२०००.

२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शाआशा-२०१३/ प्र.क्र.६८२/का.१३, दि.१७/५/२०१५.

३) महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी, नाशिक या संस्थेच्या दि.४ जुलै, २०१५ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.७.१.

केंद्र शासनाने दिलेल्या मंजूरीस अनुसरून व महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी, नाशिक या संस्थेच्या संदर्भ क्र. ३ येथे नमूद दि.४ जुलै, २०१५ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.७.१ नूसार सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात १) पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे २) सहस्त्रकुंड, ता. किनवट, जि. नांदेड ३) देवाडा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर या तीन ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतच्या एकलव्य निवासी शाळा सुरू करण्याचा ठराव पारीत करण्यात आला असून सदर ठरावाच्या अनुषंगाने खालील तीन ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतच्या एकलव्य निवासी शाळा सुरू करण्यास शासनाच्या एकलव्य निवासी शाळांसाठीच्या आदिवासी विकास विभागाच्या प्रचलित धोरणास अनुसरून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(१) पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे.
(२) सहस्त्रकुंड, ता. किनवट, जि. नांदेड.
(३) देवाडा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर.

(बापुसाहेब सोनवणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner